दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# अभिनेत्यांच्या शानदार सादरीकरणाने रंगली एकपात्री अभिनय स्पर्धा

## धुळ्यातील नाट्य कलावंतांचे उत्तम सादरीकरण : परिक्षक श्रीनिवास नार्वेकर

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने आयोजित शंभरावे नाट्य संमेलनाच्या निमित्ताने जानेवारी ते मे २०२४ महाराष्ट्रभर



नाट्यकलेचा जागर सुरु आहे. त्या अंतर्गत महोत्सव १५ जानेवारीपासून सुरू झाला आहे. यात धुळ्यात दि २८ रोजी एकपात्री स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

नाट्य परिषदेच्या धुळे जिल्हा शाखेतर्फे देखील विविध स्पर्धा सुरु असून रविवार दि. २८ जानेवारी रोजी पत्रकार भवन, साक्री रोड येथे एकपात्री स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये कलावंत देखील सहभागी झाले होते. या स्पर्धेचे उदघाटन धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष मिलिंद बैसाणे व धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज गर्दे यांच्या हस्ते करण्यात आले. तर व्यासपीठावर मुंबई नियामक मंडळ सदस्य चंद्रशेखर पाटील, परीक्षक परिक्षक श्रीनिवास नार्वे कर, परिक्षक प्रदीप राणे, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सचिन बागुल, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे कार्यकारणी सदस्य प्रा. मोहन मोरे आदी उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मिलिंद बैसाणे यांनी कलाकाराने छोट्या मोठ्या कला आत्मसात केल्या पाहिजेत.त्या सादर देखील केल्या पाहिजेत. असे सांगत कलाकारांना मार्गदर्शन केले.यावेळी मनोज गर्दे यांनी देखील कलाकारांचे कौतुक करत मार्गदर्शन केले.

कलाकारांना मार्गदर्शन करतांना चंद्रशेखर पाटील यांनी सांगितले कि, सर्व स्पर्धकांनी चांगला अभिनय केला. परंतु नाटकांची माहिती घेत. नवनवीन देखील शिकत राहावे. शेवटच्या पायरी पर्यंत यश कसे प्राप्त करता येईल यासाठी परिश्रम देखील घेतले पाहिजे असे देखील कलाकरांना मार्गदर्शन करताना सांगितले. या स्पर्धेतील सहभागी कलाकारांना प्रशस्तीपत्र देखील देण्यात आले. तर या स्पर्धेचा निकाल आज जाहीर करण्यात येणार आहे. या स्पर्धेतील एका विजेत्यास विभागीय स्पर्धेत प्रवेश मिळणार आहे. त्यानंतर उपांत्य अंतिम फेरी होईल. अशा तीन फेर्यांमध्ये ही स्पर्धा होईल. त्यानंतर मुंबई येथे अंतिम फेरीचे आयोजन केले आहे. अंतिम फेरीत निवड झालेल्या कलावंतांसाठी चार दिवसीय नाट्य कार्यशाळेचे आयोजन केले असून, व्यावसायिक कलावंतांसह महाराष्ट्रातील हौशी कलावंतांना नाट्यसंमेलनात कला सादर करण्याची संधी या नाट्यकलेचा जागरमधून मिळणार आहे.





धुळे शाखेतर्फे परिक्षकांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.



सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

### कलाकारांनी संहिता स्वतः लिहली : श्रीनिवास नार्वेकर

**परिक्षक श्रीनिवास नार्वेकर यांनी देखील कलरकरांना मार्गदर्शन करताना सांगितले कि, सर्वांचे आवाज खणखणीत होते. अनेकांनी संहिता स्वत:लिहली होते. तसेच धुळ्यातील कलाकारांचे कौतुक देखील त्यांनी केले. त्यांना शुभेच्छा देखील दिल्या.**

### या स्पर्धकांनी नोंदविला सहभाग

**चंद्रकांत पाटील, शशिकांत नागरे, किसन पाटील, स्वराज सावंत, राहुल मंगळे, साहिल तुपे, घनश्याम माळी यांनी सहभाग नोंदवला होता.**

### व्यासपीठ मिळाले

**माझ्या पहिला एकपात्री प्रयोग होता. लहान स्पर्धाची आवड होती. प्रयत्न करत राहिलो व मला अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेमुळे व्यासपीठ मिळाले आहे.**